# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-401101 दुरध्वनी क्रं.28192828

**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**


---

जा.क्र.मनपा/पा.पु.व मलनि/५८५ /२०२६-२७          दि. १५/०६/२०२६

**प्रति,**
**जनसंपर्क अधिकारी,**
**जनसंपर्क विभाग**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**विषय - प्रेस नोट प्रसिद्ध करणेबाबत.**

**महोदय,**

सोबत जोडलेली प्रेस नोट महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.

**(शरद नानेगांवकर)**
**कार्यकारी अभियंता**
**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

## // प्रेसनोट //

**दि.१५/०६/२०२६**

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, मिरा-भाईंदर शहरास स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) कडून पाणी पुरवठा करण्यात येतो.

अलनिनो व आयओडीच्या प्रभावामुळे या वर्षी पावसाळा लांबण्याची शक्यता आहे. याबाबत जलसंपदा विभागाबरोबर दि. ०९/०६/२०२६ रोजी झालेल्या आढावा बैठकीच्या निर्णयाप्रमाणे, आगामी कालावधीत पाणी टंचाईची परिस्थिती उद्‌भवू नये म्हणुन २०% पाणी कपात करण्याचे ठरले आहे. त्यानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (MIDC) पाणी कपात करण्याकरिता मिरा भाईंदर शहराचा पाणी पुरवठा गुरूवार, दि. १८/०६/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेपासून शुक्रवार, दि. १९/०६/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत एकूण २४ तास पाणी पुरवठा बंद राहील. तसेच स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा सुरु राहणार आहे.

तरी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (MIDC) होणारा पाणी पुरवठा पुर्ववत होईपर्यत मिरा-भाईंदर शहरास पाणी पुरवठा कमी दाबाने व उशीराने होईल. नागरीकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे.